दैनिक
# चकमक
संपादक : शामसुंदर चितोडा    कार्यकारी संपादक : कैलास फुलारी









वर्ष : ०१ ले ✻ अंक : २६ ✻ जालना ✻ ✻ गुरूवार २७ ऑगस्ट २०२६ ✻ ✻ पाने : ४ ✻ ✻किंमत : २ रूपये ✻


# अल्प पावसामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना विशेष आर्थिक पॅकेज द्या

## पीक विम्यासह हेक्टरी नुकसानभरपाई, कर्जवसुलीस स्थगिती आणि चारा-पाण्याची व्यवस्था करण्याची बबनराव लोणीकरांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

जालना, प्रतिनिधी : मराठवाड्यात जून व जुलै महिन्यात झालेल्या अत्यल्प व खंडित पावसामुळे खरीप हंगामातील पिके गंभीर संकटात सापडली आहेत. सोयाबीन, कापूस, तूर, मूग, उडीद, मका यासह विविध पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता असून, नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत तातडीने भरपाई देण्यासोबतच राज्य शासनाने विशेष आर्थिक पॅकेज जाहीर करावे, अशी मागणी माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. यासंदर्भात लोणीकर यांनी मुख्यमंत्र्यांना पत्र पाठवून मराठवाड्यातील सद्यस्थितीची माहिती दिली आहे. जमिनीतील ओलावा संपल्याने अनेक भागांत पिकांनी माना टाकल्या असून उत्पादनात मोठी घट होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर विहिरी व बोअरवेलमधील पाणीसाठा कमी होत असल्याने पिण्याचे पाणी, जनावरांसाठी पाणी आणि चाऱ्याचा प्रश्नही गंभीर बनत असल्याचे त्यांनी पत्रात नमूद केले आहे. शेतकऱ्यांची अडचण लक्षात घेऊन दि. ३१ जुलै २०२६ रोजी प्रधानमंत्री पीक विमा योजनेचा अर्ज भरण्याची मुदत किमान १५ दिवसांनी वाढविण्याची मागणी आपणाकडे केली होती. त्यानुसार सकारात्मक निर्णय घेत मुदतवाढ दिल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांचे लोणीकर यांनी आभार



मानले आहेत. मात्र, सध्याची परिस्थिती पाहता केवळ पीक विम्याच्या अर्जासाठी मुदतवाढ देणे पुरेसे नसून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना प्रत्यक्ष आर्थिक मदत मिळणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. तसेच परिस्थितीचा गावनिहाय आढावा घेऊन आवश्यक भागात दुष्काळसदृश परिस्थितीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणीही त्यांनी केली आहे. मराठवाड्यातील शेतकरी अत्यंत कठीण परिस्थितीत असून शासनाने (पान ३ वर)

### तातडीने पंचनामे करण्याची मागणी

**नुकसानग्रस्त सर्व पिकांचे तातडीने प्रत्यक्ष पंचनामे करण्यात यावेत आणि पात्र शेतकऱ्यांना प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत नुकसानभरपाई त्वरित मिळवून द्यावी, अशी मागणी लोणीकर यांनी केली आहे. पीक विम्याच्या कक्षेबाहेर राहणाऱ्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने स्वतंत्र विशेष आर्थिक मदत पॅकेज जाहीर करावे, तसेच सोयाबीनसह सर्व खरीप पिकांसाठी हेक्टरी विशेष नुकसानभरपाई देण्यात यावी, असेही त्यांनी म्हटले आहे.**

# शहागड येथे पत्रकाराच्या घरावर तलवार-लाठ्यांनी हल्ला; १० जणांविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा

## आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी; घरासमोर जमाव करून शिवीगाळ, मारहाण व दहशत निर्माण केल्याचा आरोप

अंबड प्रतिनिधी : अंबड तालुक्यातील शहागड येथे पत्रकाराच्या घरासमोर जमाव करून तलवार, लाठ्या-काठ्या व दगडांचा वापर करत हल्ला केल्याच्या आरोपाने परिसरात खळबळ उडाली आहे. या प्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात तब्बल दहा जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) तसेच शस्त्र अधिनियमातील गंभीर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे पत्रकार व त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला असून, या प्रकरणातील सर्व आरोपींना पोलिसांनी तातडीने अटक करून कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे. गोंदी पोलीस ठाण्यात दाखल एफआयआर क्रमांक ०२५०/२०२६ नुसार, ही घटना २१ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ७.३० ते ८ वाजण्याच्या दरम्यान घडल्याचे नमूद आहे. याप्रकरणी रहीम अहेमद शेख



(वय ६५, व्यवसाय शेती, रा. शहागड, ता. अंबड) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलिसांनी गुन्हा नोंदविला आहे.
फिर्यादीनुसार, आरोपी घरासमोर जमून शिवीगाळ व आरडाओरड करत असल्याचा आरोप आहे. त्यानंतर फिर्यादी व त्यांचा मुलगा अशफाक शेख यांच्यासोबत वाद घालून मारहाण करण्यात आल्याचे तक्रारीत नमूद आहे. तलवार, लाठ्या-काठ्या यांसारख्या हत्यारांचा वापर करून हल्ला करण्याचा प्रयत्न केल्याचा तसेच घराच्या परिसरात दगडफेक करून नुकसान केल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या घटनेत फिर्यादी रहीम अहेमद शेख हे जखमी झाले असून त्यांच्यावर बीड येथील शासकीय रुग्णालयात उपचार (पान ३ वर)

**दहा आरोपींची नावे एफआयआर मध्ये फिर्यादीत शाकेर शरीफ शेख, सद्दाम मैनौद्दीन शेख, शहेबाज शाकेर शेख, अर्शद शाकेर शेख, जुबेर मुजीब शेख, लुकमान मैनौद्दीन शेख, सुलेमान मैनौद्दीन शेख, मुजीब शरीफ शेख, नियाजोद्दीन जैनोद्दीन शेख आणि मैनौद्दीन जैनोद्दीन शेख यांची आरोपी म्हणून नावे नमूद करण्यात आली आहेत.**

# पाटोदा येथे 'डिजिटल पाटोदा - समृद्ध शेतकरी' अभियान संपन्न

पाटोदा/प्रतिनिधी : शिवराणा मल्टिसर्व्हिसेस, पाटोदा यांच्या वतीने मोफत डिजिटल व शासकीय योजना मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. 'डिजिटल पाटोदा - समृद्ध शेतकरी अभियान' या उपक्रमास नागरिक, महिला, शेतकरी व विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात शेतकऱ्यांना ७/१२ उतारा, पीक विमा, कृषी अनुदान योजना, ई-केवायसी, आधार व पॅन कार्ड सेवा, उत्पन्न व जातीचे दाखले तसेच विविध शासकीय योजनांच्या ऑनलाइन नोंदणीबाबत मोफत मार्गदर्शन करण्यात आले. शिवराणा मल्टिसर्व्हिसेसचे




श्री. कमलेश मुंढे यांनी उपस्थितांना डिजिटल सेवांचा सुरक्षित वापर, शासकीय योजनांचा व्यवसाय व रोजगार निर्मितीसाठी उपयोग आणि कमी भांडवलात उत्पन्नाचे नवीन मार्ग याबाबत मार्गदर्शन केले. नागरिकांना दैनंदिन डिजिटल सुविधा गावातच उपलब्ध करून देणे आणि व्हॉट्सपच्या माध्यमातून घरबसल्या सेवा देणे हा या अभियानाचा मुख्य उद्देश आहे. शासकीय योजना प्रत्येक पात्र नागरिकांपर्यंत पोहोचवण्यासाठी भविष्यातही असे उपक्रम राबविणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले. या कार्यक्रमास गावातील शेतकरी, महिला, युवक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तालुका ग्रामीण कॉंग्रेस कमिटी, जालना आढावा बैठक संपन्न

जालना तालुका ग्रामीण कॉंग्रेस कमिटीच्या वतीने तालुकाध्यक्ष कृष्णा पडुळ यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी माननीय श्री डॉ.कल्याणराव काळे साहेब व कल्याणराव दळे साहेब यांनी पक्ष संघटन व एस.आय. आर. (मतदान पुनर सर्वेक्षण या विषयावर मार्गदर्शन केले त्याच प्रमाणे पुढिल होऊ घातलेल्या जिल्हापरिषद व ग्रामपंचायती निवडनुका मध्ये यश मिळेल याची तयारी करणे यावर संबोधन केले. या बैठकीस पुढील प्रमाणे प्रमुख मान्यवर उपस्थित होते यामध्ये लोकप्रिय खासदार डॉ. कल्याणराव काळे साहेब, उपाध्यक्ष राजेंद्र राख, जिल्हाध्यक्ष कल्याणराव दळे, अ.सं. उपाध्यक्ष बदर चाऊस, महानगर जिल्हाध्यक्ष डॉ. विशाल धानुरे, माजी जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशमुख, ज्येष्ठ नेते ज्ञानेश्वर भांदरगे, राम कुऱ्हाडे, सुभाष कोळकर, अविनाश चव्हाण, अशोक उबाळे, राजेंद्र गोरे, रघुवीर गुडे, देवराज डोंगरे, सचिन कचरे, सुनील चौधरी, दांडगे ताई ,सोपानराव तिरुखे, नारायण काका शिंदे, गणेश राव खरात,लाला पाटील लकडे ,समाधान शेजुळ ,राजुभाऊ साबळे, मोहनराव जाधव, बबूभाई, गौतम भलमोडे, सुधाकर आण्णा ढोकळे, श्रीहरी साबळे, राम पवार, गणेश शिरसाठ, काकासाहेब शिरसाठ, बाळू भाऊ वाहुळे, विशाल वाहुळे,संजय भाऊ धनगड, नारायणराव काळे, राम मोरे, रंगनाथराव काळे, राजू झिने, रंगनाथ शिंदे, गंगारामजी मेंद, गणेश डोंगरे, दिपक तिडके, शिवाजी डोंगरे,

# जालना शहरातील दोन रेल्वे पुलांसाठी ९७.६२ कोटींची मंजुरी

जालना : जालना शहरातील बायपास वळण रस्त्यावर होणारी वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी दोन महत्त्वपूर्ण रेल्वे पुलांच्या बांधकामाला ✻तब्बल ९७.६२✻ कोटी रुपयांची प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. (सुधारीत प्रमा ७३) ९०५ कोटी रुपये) जालना शहरातील कुंडलिका नदीजवळील विद्यमान रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन समांतर रेल्वे पूल बांधण्यात येणार असून, मोतीबाग रेल्वे पुलाचे नव्याने चौपदरीकरण करण्यात येणार आहे. या दोन्ही कामांमुळे शहरातील वाहतुकीला मोठा दिलासा मिळणार आहे.जालना शहरातील बायपास वळण रस्ता चौपदरी असून, या मार्गावरील दोन्ही रेल्वे पुलांवर सध्या दुहेरी वाहतूक होत असल्याने सातत्याने वाहतूक कोंडी निर्माण होत होती. विशेषतः शहरातील वाढती वाहतूक आणि वाहनांची संख्या लक्षात घेता या पुलांवरील वाहतुकीचा प्रश्न गंभीर बनला



होता. ही बाब जालना विधानसभा ✻मतदारसंघाचे आमदार अर्जुनराव खोतकर यांनी गांभीर्याने घेतली. त्यांनी राजधानी नवी दिल्ली येथे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीनजी गडकरी तसेच केंद्रीय रेल्वेमंत्री मा. ना. अश्विनी वैष्णव माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील✻ यांची भेट घेऊन जालना शहरातील रेल्वे पुलांमुळे निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीची समस्या त्यांच्या निदर्शनास आणून दिली. तसेच या ठिकाणी नवीन समांतर रेल्वे पूल उभारण्यासह विद्यमान पुलाचे चौपदरीकरण करण्याची मागणी केली. आ. खोतकर यांच्या मागणीची केंद्र सरकारने दखल घेतली असून, मोती तलाव परिसरातील विद्यमान रेल्वे पुलाचे पुनर्बांधकाम करून नवीन चौपदरी रेल्वे पूल उभारण्यास तसेच कुंडलिका नदीजवळील विद्यमान रेल्वे पुलाच्या बाजूला नवीन समांतर रेल्वे पूल बांधण्यास मंजुरी देण्यात आली आहे. या दोन्ही महत्त्वपूर्ण कामांसाठी जवळपास ९७.,,६२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.विशेष म्हणजे, या कामांची निविदा प्रक्रिया पूर्ण झाली असून लवकरच प्रत्यक्ष कामाला लवकरच सुरुवात होणार आहे. त्यामुळे जालना शहरातून बायपास मार्गावरून जाणाऱ्या वाहनांना मोठा दिलासा मिळणार असून रेल्वे पुलांवर वारंवार निर्माण होणारी वाहतूक कोंडी कायमस्वरूपी दूर होण्यास मदत होणार आहे. यावेळी बोलताना आ. अर्जुनराव खोतकर म्हणाले✻ की, जालना शहराची वाढती लोकसंख्या आणि वाढती वाहनांची संख्या लक्षात घेता शहरातील (पान ३ वर)

# चंदनझिरा पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या खुनातील मुख्य आरोपीला १२ तासांत ठोकल्या बेड्या; पोलिसांच्या पथकाची उल्लेखनीय कामगिरी

जालना । प्रतिनिधी : जालना शहरातील चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या हद्दीत झिरो पॉईंट परिसरात भररात्री झालेल्या खुनाच्या घटनेने खळबळ उडाली होती. धारदार चाकूने वार करून निखील परमेश्वर पवार, रा. नागेवाडी याची हत्या करण्यात आली. घटनेनंतर परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. मात्र, चंदनझिरा पोलिसांनी परिस्थितीवर तत्काळ नियंत्रण मिळवत खुनाच्या गुन्ह्यातील मुख्य आरोपी संतोष ऊर्फ पिंट्या हरीभाऊ लांडे, रा. नागेवाडी याला अवघ्या १२ तासांत अटक करून पोलिसांच्या तपासाची चुणूक दाखवून दिली. दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास झिरो पॉईंट परिसरात निखील पवार याच्यावर धारदार चाकूने वार करण्यात आले. गंभीर जखमी झालेल्या निखीलचा मृत्यू झाला. या घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मयताचा नातेवाईक श्याम पवार यांच्या तक्रारीवरून चंदनझिरा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली तपासाची चक्रे वेगाने घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन जालना जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधु आणि अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी यांनी आरोपींचा तातडीने शोध घेऊन कठोर कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

त्यानुसार उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी आणि चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी तपासाला वेग दिला. घटनास्थळाची पाहणी, उपलब्ध माहितीचे संकलन, तांत्रिक तपास तसेच गुप्त माहितीच्या आधारे संशयितांचा शोध घेण्यात आला. पोलिसांच्या अथक प्रयत्नांनंतर मुख्य आरोपी संतोष ऊर्फ पिंट्या हरीभाऊ लांडे याचा ठावठिकाणा शोधून काढण्यात आला आणि घटनेनंतर अवघ्या १२ तासांत त्याला बेड्या ठोकण्यात आल्या.

२९ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी अटक करण्यात आलेल्या आरोपीला न्यायालयासमोर हजर करण्यात आले असता न्यायालयाने त्यास दि. २९ ऑगस्ट २०२६




पर्यंत पोलीस कस्टडी रिमांड मंजूर केला आहे. या खून प्रकरणातील आणखी तीन आरोपी फरार असून, त्यांचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध पथके युद्धपातळीवर कार्यरत आहेत. या प्रकरणाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी करीत आहेत. खुनाच्या घटनेनंतर झिरो पॉईंट परिसरात काही काळ तणाव निर्माण झाला होता. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून चंदनझिरा पोलिसांनी अतिरिक्त दक्षता घेत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवली. पोलिसांच्या संयमी आणि कर्तव्यदक्ष भूमिकेमुळे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही आणि परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यात यश आले. खुनाच्या गुन्ह्याचा वेगाने तपास करून मुख्य आरोपीला काही तासांतच अटक केल्याने नागरिकांमध्ये पोलिसांबद्दलचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. गुन्हा करून फरार झालेला आरोपी कितीही लपण्याचा प्रयत्न करीत असला, तरी कायद्याच्या कचाट्यातून त्याची सुटका होऊ शकत नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून




देण्यात आला आहे. झिरो पॉईंट परिसरातील अतिक्रमणांवरही संयुक्त कारवाई दरम्यान, खुनाच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर झिरो पॉईंट परिसरातील अतिक्रमणांचा प्रश्नही ऐरणीवर आला आहे. शासकीय मालकीच्या जमिनीवर अतिक्रमण करून हॉटेल, टपऱ्या तसेच विविध अनधिकृत बांधकामे करण्यात आली होती. त्यामुळे परिसरात गर्दी वाढून गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींचा वावर वाढण्यासह वाहतुकीला मोठा अडथळा निर्माण होत होता. या परिस्थितीमुळे अपघात होऊन जीवितहानी होण्याची शक्यताही वाढली होती. नागरिकांची सुरक्षितता, वाहतूक व्यवस्था आणि कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलीस प्रशासन, महानगरपालिका प्रशासन आणि एमआयडीसी प्रशासनाने संयुक्तपणे कारवाई केली.

या कारवाईत झिरो पॉईंट परिसरातील अनधिकृत अतिक्रमणे, हॉटेल, टपऱ्या आणि इतर अनधिकृत बांधकामे हटविण्यात आली. त्यामुळे परिसर मोकळा होऊन वाहतुकीतील अडथळे दूर होण्यास तसेच भविष्यातील अनुचित प्रकारांना आळा बसण्यास मदत होणार आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्री. तेगबीरसिंह संधु, अपर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी यांच्या मार्गदर्शनाखाली उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक श्री. किरण बिडवे, पोउपनि दिगंबर पवार, निता दामधर, पोउपनि सय्यद अफसर, मारीयो स्कॉट, सफौ राजेंद्र ठाकूर, पोहेकॉ प्रशांत देशमुख, कृष्णा तंगे, राजू पवार, अभिजीत वायकोस, मदन बहुरे, विशाल लोखंडे, शरद पवार, संतोष वनवे, पोकॉ सागर खैरे, नवनाथ पाटील तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयातील पोउपनि पवन राजपूत, पोहेकॉ हारुण पठाण यांच्या पथकाने केली. मुख्य आरोपीला अवघ्या १२ तासांत अटक करण्याबरोबरच तणावपूर्ण परिस्थितीत कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवणे आणि झिरो पॉईंट परिसरातील अतिक्रमणांवर संयुक्त कारवाई करणे, या तिन्ही आघाड्यांवर चंदनझिरा पोलिसांनी केलेली कामगिरी चर्चेचा विषय ठरली आहे.

# संपादकीय

## नव्या राजवटीत हक्कांची पायमल्ली

नेपाळमधील या अंतर्गत राजकीय आणि सामाजिक अस्थिरतेचे पडसाद केवळ त्यांच्या सीमांपुरते मर्यादित राहू शकत नाहीत, कारण नेपाळचे भारताशी असलेले संबंध अत्यंत जिव्हाळ्याचे आणि भौगोलिकदृष्ट्या संवेदनशील आहेत. दोन्ही देशांमध्ये असलेली खुली सीमा ही एका बाजूने दोन्ही संस्कृतींना जोडणारा दुवा असली, तरी नेपाळमधील अस्थिरतेच्या काळात ती भारताच्या अंतर्गत सुरक्षेसाठी मोठी चिंतेची बाब ठरते. नेपाळमध्ये अंतर्गत संघर्ष वाढल्यास किंवा कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास सीमेपलीकडून होणारी गुन्हेगारी, अमली पदार्थांची तस्करी आणि भारतविरोधी घटकांची घुसखोरी वाढण्याचा थेट धोका निर्माण होतो. नेपाळमध्ये जेव्हा जेव्हा अंतर्गत असंतोष किंवा राजकीय पोकळी निर्माण होते, तेव्हा चीनसारख्या परकीय शक्तींना तिथे आपला प्रभाव वाढवण्याची मोठी संधी मिळते. नेपाळला या संकटातून बाहेर काढण्यासाठी शाह यांना त्यांच्या प्रशासकीय भूमिकेत बदल करून गरिबांना आणि तरुणांना विश्वासात घ्यावे लागेल. दरम्यान, भारतासाठी हा काळ अत्यंत सावधगिरीने पावले टाकण्याचा आहे. नेपाळचा हा अंतर्गत संघर्ष शांत व्हावा आणि तिथे स्थिर सरकार राहावे, यातच भारताचेही हित सामावले आहे. शेजारी देशातील शांतता हीच भारताच्या सीमेवरील सुरक्षेची सर्वात मोठी हमी असू शकते. राजकीय दृष्टिकोनातून पाहिले तर नेपाळमध्ये 'व्यक्तिकेंद्री बदल' किती टिकाऊ असतो, हा प्रश्न पुन्हा एकदा समोर आला आहे. आंदोलनातून निर्माण झालेल्या सरकारने प्रशासनातील सुधारणा करण्यासाठी सक्षम यंत्रणा उभी केली नाही, तर लोकांचा विश्वास डळमळीत होणे स्वाभाविक आहे. या संपूर्ण परिस्थितीकडे भारताने केवळ शेजारी देशातील अंतर्गत राजकारण म्हणून पाहता कामा नये. भारत आणि नेपाळ यांचे संबंध सांस्कृतिक, आर्थिक, धार्मिक आणि सामाजिकदृष्ट्याही अतिशय जवळचे आहेत. बिघडलेल्या संबंधांचा पहिला परिणाम सुरक्षा व्यवस्थेवर होऊ शकतो. खुल्या सीमेमुळे अस्थिरतेच्या काळात तस्करी, बनावट चलन, शस्त्रांची हालचाल किंवा गुन्हेगारी नेटवर्क सक्रिय होण्याचा धोका वाढतो. भारत आणि नेपाळ यांच्यातील सुरक्षा सहकार्य त्यामुळे अधिक महत्त्वाचे ठरते. याशिवाय भारत हा नेपाळचा सर्वात मोठा व्यापार भागीदार आहे. सीमावर्ती भागातील आंदोलन, वाहतूक अडथळे किंवा प्रशासनातील अस्थिरता यामुळे पुरवठा साखळी विस्कळीत होऊ शकते. त्याचा परिणाम दोन्ही देशांमधील उद्योग आणि सीमाभागातील अर्थव्यवस्थेवर होऊ शकतो. नेपाळचा राजकीय इतिहास हा नेहमीच अस्थिरतेच्या आणि अचानक येणाऱ्या परिवर्तनांच्या लाटांनी वेढलेला राहिला आहे. राजेशाहीचा अंत, माओवादी बंडखोरी आणि त्यानंतर लोकशाहीचा स्वीकार अशा अनेक वळणांवरून गेलेला हा देश सध्या पुन्हा एकदा एका मोठ्या अंतर्गत संघर्षाच्या आणि तीव्र असंतोषाच्या उंबरठ्यावर उभा आहे. मार्च २०२६ च्या निवडणुकांमध्ये ज्या 'जनरेशन झेड' म्हणजेच तरुण पिढीने एका मोठ्या क्रांतीची अपेक्षा ठेवून रॅपर आणि काठमांडूचे माजी महापौर बालेंद्र शाह यांच्या हाती देशाची सूत्रे सोपवली होती, तीच तरुण पिढी आज त्यांच्याविरोधात रस्त्यावर उतरली आहे. ज्यांनी सत्तेच्या शिखरावर बसवले, त्यांनीच अवघ्या काही महिन्यांमध्ये विरोधाचा झेंडा हाती घेतल्यामुळे नेपाळमधील हा संघर्ष केवळ राजकीय उरलेला नाही, तर एका सामाजिक आणि आर्थिक असंतोषाचा ज्वालामुखी बनला आहे. या ताज्या आंदोलनांची ठिणगी काठमांडूच्या रस्त्यांवर पडली. एका राईड-शेअरिंग ड्रायव्हरने (गणेश नेपाळी) म्युनिसिपल पोलिसांसोबत झालेल्या वादामधून आणि प्रशासकीय जाचाला कंटाळून केलेल्या आत्मदहनानंतर तरुणांच्या संतापाचा उद्रेक झाला; परंतु हे केवळ एका घटनेचे तात्कालिक पर्यवसान नाही. या आंदोलनामागे खोलवर रुजलेली कारणे आहेत. शाह यांच्या सरकारने शहराच्या सुशोभीकरणाच्या आणि शिस्तीच्या नावाखाली हजारो गरीब आणि भूमिहीन झोपडीधारकांना पुनर्वसनाशिवाय बेघर केले. गरिबांना थेट रस्त्यावर आणणाऱ्या या मोहिमांमुळे प्रशासकीय क्रूरतेचा चेहरा समोर आला आणि नेपाळमध्ये नव्याने आंदोलन पेटले. आर्थिक संकट, बेरोजगारी आणि वाढत्या महागाईमुळे आधीच होरपळत असलेल्या नेपाळी तरुणांना नवीन सरकारकडून रोजगाराच्या संधी आणि सहानुभूतीची अपेक्षा होती; परंतु त्याऐवजी त्यांना दंडात्मक कारवाया, प्रशासकीय हुकूमशाही आणि गरिबांना टार्गेट करणारी धोरणे पाहायला मिळाली. शाह यांच्या विरोधातील या तीव्र नाराजीचे विश्लेषण करताना त्यांच्या कार्यपद्धतीचा अभ्यास करणे गरजेचे ठरते. शाह हे पारंपरिक नेपाळी राजकारणाला कंटाळलेल्या मतदारांसाठी बदलाचा एक मोठा चेहरा म्हणून पुढे आले होते. त्यांचा आक्रमक आणि स्पष्टवक्ता स्वभाव तरुणांना आकर्षित करत होता; मात्र सत्तेवर आल्यानंतर हाच आक्रमक स्वभाव एकाधिकारशाही आणि असंवेदनशीलतेमध्ये बदलल्याचा आरोप आता होत आहे. विरोधकांचे म्हणणे ऐकून न घेणे, 'सोशल मीडिया' आणि माध्यमांवर अघोषित बंधने आणण्याचा प्रयत्न करणे आणि जमिनीवरील गरिबांच्या वास्तववादी समस्यांकडे पूर्णपणे डोळेझाक करणे, यामुळे त्यांची लोकप्रियता कमालीची घसरली आहे. ज्या लोकशाही आणि मानवी हक्कांच्या नावावर त्यांनी तरुणांची मते मिळवली, त्याच हक्कांची पायमल्ली नव्या राजवटीत होत असल्याचा सूर उमटत असल्यामुळे शाह सध्या कमालीचे बचावात्मक भूमिकेत आले आहेत.

# गणरायांच्या उत्सवासाठी बेस्टचे नवे नियम

गणेशोत्सव मंडळांसाठी 'BEST'चे नवे वीज नियम; तात्पुरत्या कनेक्शनसाठी अर्जापासून शुल्कापर्यंत सर्व माहिती

मुंबई : गणेशोत्सव २०२६च्या पार्श्वभूमीवर मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांसाठी बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम अर्थात इएड्ढने तात्पुरत्या वीज जोडणीसंदर्भात सविस्तर मार्गदर्शक सूचना जारी केल्या आहेत. मंडपांना वीज जोडणी घेताना आवश्यक परवानग्या, विद्युत सुरक्षा, अर्ज प्रक्रिया, सुरक्षा ठेव, मीटर शुल्क आणि वीज दर यांची पूर्तता करावी लागणार आहे. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनी अर्ज करण्यापूर्वी या नियमांची माहिती घेणे महत्त्वाचे आहे.

ऑनलाइन अर्जाची सुविधा

BESTZo मंडळांना अर्ज प्रक्रियेत मदत करण्यासाठी आपल्या सर्व ग्राहक सेवा विभागांमध्ये सुविधा कक्ष उपलब्ध करून दिले आहेत. आयोजक इएड्ढच्या वेबसाइटवरून तात्पुरत्या वीज जोडणीसाठी ऑनलाइन अर्ज करू शकतात. ऑनलाइन अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंटआउट आवश्यक कागदपत्रे आणि हमीपत्रासह संबंधित ग्राहक सेवा विभागात सादर करावी लागेल. अर्जामध्ये मंडळाचे नाव, संपूर्ण पत्ता, वीज जोडणी आवश्यक असलेला कालावधी, जबाबदार प्रतिनिधीची माहिती आणि मंडळाच्या बँक खात्याचे तपशील देणे आवश्यक आहे. सुरक्षा ठेव परत मिळवण्यासाठी मंडळांनी विहित अर्जही सादर करावा लागेल. वीज वापराचे अंतिम बिल समायोजित केल्यानंतर उर्वरित सुरक्षा ठेव परत केली जाईल. आवश्यक अर्ज सादर केल्यास ही रक्कम एका महिन्याच्या आत छएऋद्धारे मंडळाच्या बँक खात्यात जमा केली जाईल. अर्ज सादर न केल्यास इएड्ढकडून ९० दिवसांच्या आत चेक किंवा डिमांड ड्राफ्टद्वारे परतावा केला जाईल.

**मंडपासाठी कोणत्या परवानग्या आवश्यक?**

खासगी जमीन किंवा गृहनिर्माण संस्थेच्या जागेवर मंडप उभारणाऱ्या मंडळांना जमीनमालक किंवा संबंधित सोसायटीची परवानगी घ्यावी लागेल. त्याचबरोबर विद्युत निरीक्षकाची परवानगी किंवा संबंधित विभागाकडे केलेल्या अर्जाची प्रत सादर करावी लागेल. रस्ते किंवा पदपथावर मंडप उभारणाऱ्या मंडळांना इचउचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्थात छजउ आवश्यक आहे. याशिवाय संबंधित पोलीस ठाण्याची चालू वर्षाची परवानगी सादर करावी लागेल. परवानगी अद्याप मिळाली नसल्यास, चालू वर्षाच्या पोलीस अर्जाची साक्षांकित पावती स्वीकारली जाऊ शकते.

**विद्युत सुरक्षेला सर्वाधिक महत्त्व**

इएड्ढने तात्पुरत्या वीज जोडणीसाठी विद्युत सुरक्षेचे नियम काटेकोरपणे पाळण्याचे निर्देश दिले आहेत. मंडळांनी परवानाधारक विद्युत कंत्राटदाराकडून मंडपातील एकूण विद्युत भाराचे मूल्यांकन करून घ्यावे. या भाराची माहिती अर्जात नमूद करावी लागेल. कंत्राटदाराने मंडपात वापरल्या जाणाऱ्या सर्व विद्युत उपकरणांचा एकूण भार नमूद असलेला चाचणी अहवाल द्यावा लागेल. त्यासोबत एडउइ अर्थात एर्रीह ङशरज्ञरसश उळीलींळीं ईशरज्ञशीचा चाचणी अहवालही आवश्यक आहे. मंडपातील वायरिंग योग्य क्षमतेचे आणि भारतीय विद्युत नियमांनुसार असणे आवश्यक आहे. वायरिंग केवळ परवानाधारक कंत्राटदाराकडूनच करून घ्यावी. वीज तारा थेट जमिनीवर टाकू नयेत किंवा पथदिव्यांच्या खांबाभोवती गुंडाळू नयेत. अपघात टाळण्यासाठी सर्व विद्युत जोडण्या सुरक्षित पद्धतीने करणे बंधनकारक आहे.




**कनेक्शन आणि मीटर शुल्क किती?**

तात्पुरत्या जोडणीसाठी सिंगल-फेज मागणी अर्जासाठी ९० रुपये, तर थ्री-फेज अर्जासाठी १४५ रुपये शुल्क आकारले जाईल. ज्या ठिकाणी आवश्यक पायाभूत सुविधा आधीपासून उपलब्ध आहेत, तिथे सिंगल-फेज जोडणीसाठी १५० रुपये, तर थ्री-फेजसाठी २०० रुपये कनेक्शन शुल्क आकारले जाईल. पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यास प्रत्यक्ष खर्च मंडळाकडून वसूल केला जाऊ शकतो. सुरक्षा ठेवेसाठी २०२५च्या गणेशोत्सवातील वीज बिलाइतकी रक्कम किंवा नवीन मंडळांसाठी प्रति किलोवॅट प्रति दिवस २० रुपये, यापैकी जी रक्कम अधिक असेल ती लागू होईल. मीटरसाठी स्वतंत्र ठेवही आकारली जाईल. सिंगल-फेज मीटरसाठी ३,५०० रुपये, ६० किलोवॅटपर्यंतच्या थ्री-फेज मीटरसाठी ४,७०० रुपये, तर ६० किलोवॅटपेक्षा जास्त भारासाठी उढ मीटरसाठी १०,५०० रुपये ठेव निश्चित करण्यात आली आहे.

**गणेश मंडळांना सवलतीचा वीज दर**

इएड्ढच्या माहितीनुसार, तात्पुरत्या वीज जोडणीचे बिल महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग अर्थात चएठउने मंजूर केलेल्या २०२६-२७च्या दरपत्रकानुसार आकारले जाईल. गणेशोत्सव मंडळांना १ एप्रिल २०२६पासून लागू असलेल्या सवलतीच्या निवासी श्रेणीतील दराचा लाभ मिळेल. ० ते १०० युनिट वापरासाठी स्थिर शुल्क १३५ रुपये, ऊर्जा शुल्क २.०२ रुपये प्रति युनिट आणि वहन शुल्क १.८२ रुपये प्रति युनिट आहे. १०१ ते ३०० युनिटसाठी स्थिर शुल्क २०२.५० रुपये आणि ऊर्जा शुल्क ५.३४ रुपये प्रति युनिट आहे. ३०१ ते ५०० युनिटसाठी ऊर्जा शुल्क १०.०४ रुपये प्रति युनिट, तर ५०० युनिटपेक्षा अधिक वापरासाठी स्थिर शुल्क २४० रुपये आणि ऊर्जा शुल्क ११.२५ रुपये प्रति युनिट आहे. सर्व टप्प्यांमध्ये वहन शुल्क १.८२ रुपये प्रति युनिट राहते. त्यामुळे गणेशोत्सव मंडळांनी शेवटच्या क्षणी अर्ज न करता आवश्यक परवानग्या, विद्युत भार चाचणी, एडउइ अहवाल आणि इतर कागदपत्रांची पूर्तता वेळेत करावी, असे इएड्ढने आवाहन केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधित इएड्ढ ग्राहक सेवा विभागाशी संपर्क साधता येणार आहे.

# गर्भवती मातांसाठी दिलासादायक

मुंबई : गर्भधारणा हा स्त्रीच्या आयुष्यातील महत्त्वाचा टप्पा असून योग्य आहार व देखरेखीद्वारे माता व नवजात शिशुचे आरोग्य राखणे आवश्यक आहे. भारतात अंदाजे ५२ टक्के गर्भवती महिलांमध्ये रक्तक्षय आढळून येतो. रक्तक्षयामुळे प्रसूतीदरम्यान/नंतर मातेच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. तीव्र रक्तक्षय हे माता व नवजात शिशु मृत्यूचे एक महत्त्वाचे कारण आहे. हीच समस्या दूर करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार २०१५ मध्ये आरोग्य विभागाला आयर्न सुक्रोजच्या माध्यमातून निमियावरील उपचार राबविण्याचे निर्देश दिले होते. यामुळे राज्यातील गरोदर मातांचे आरोग्य अधिक सक्षम करण्यासाठी सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनात विभागाने तीव्र रक्तक्षयावरील मोफत उपचारांना गती दिली आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रांपर्यंतच्या सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेत आयर्न सुक्रोजचा सिद्ध आणि परिणामकारक उपचार पोहोचविण्यावर मुख्यमंत्र्यांनी भर दिला आहे. या निर्णयामुळे ग्रामीण तसेच दुर्गम भागातील गरोदर मातांनाही तीव्र रक्तक्षय विशेष उपचार सुविधा उपलब्ध होण्यास मदत झाली आहे. मुख्यमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली मातृ व बाल आरोग्याला सर्वोच्च प्राधान्य देत राज्य शासनाचा सार्वजनिक आरोग्य विभाग कार्यरत आहे. तीव्र रक्तक्षयग्रस्त गरोदर मातांना वेळेत उपचार, सातत्यपूर्ण पाठपुरावा आणि सक्षम आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या या प्रयत्नांमुळे सुरक्षित मातृत्वाचा पाया अधिक भक्कम होत आहे.

तीव्र रक्तक्षयावर आयर्न सुक्रोज तसेच फेरीक कार्बोक्सी माल्टोज (एफसीएम) या औषधांद्वारे शिरेवाटे उपचार सुविधा राज्यातील शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उपलब्ध करून देण्यात आली आहे.

# इंधन उत्पादनासाठी ८.८ अब्ज डॉलरची महायोजना

नवी दिल्ली : देशांतर्गत तेल उत्खननाला गती देण्यासाठी केंद्र सरकारने ८.८ अब्ज डॉलर्सच्या (अंदाजे ८४ हजार कोटी रुपये) महत्त्वाकांक्षी योजनेचा वर्षनिहाय अंमलबजावणी आराखडा तयार करण्यास सुरुवात केली आहे. या अंतर्गत ड्रिलिंग, भूकंपीय सर्वेक्षण करण्यापासून ते प्रत्यक्ष तेल विहीर खोदण्यासाठी 'रिग' तैनात करण्यापर्यंतच्या कामांचे नियोजन केले जात आहे. केंद्रीय पेट्रोलियम मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी नुकतीच मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी आणि सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या प्रमुखांची महत्त्वाची बैठक घेतली. गुरुग्राम (हरियाणा) आणि दुलियाजान (आसाम) येथे पार पडलेल्या विचारमंथन सत्रांमधील निर्णयांच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी ही बैठक आयोजित करण्यात आली होती. पेट्रोलियम मंत्रालयाचे सध्या खोल आणि अति-खोल समुद्रातील भागात तेल व वायूचे उत्पादन वाढवण्यावर विशेष लक्ष आहे. कृष्णा-गोदावरी, महानदी, अंदमान आणि कावेरी खोऱ्यांमध्ये ड्रिलिंग आणि रिग तैनात करण्याच्या कामाला वेग देण्यासाठी हा आराखडा आता अंतिम टप्प्यात आहे. सरकारी मालकीच्या 'ओएनजीसी' आणि 'ऑइल इंडिया' या कंपन्या या योजनेच्या अंमलबजावणीत प्रमुख भूमिका बजावतील, असे मंत्री हरदीप सिंग पुरी यांनी स्पष्ट केले. सरकारकडून मिळणाऱ्या ८४ हजार कोटी रुपयांच्या निधीमुळे ओएनजीसीसाठी ही अत्यंत फायदेशीर संधी ठरणार आहे. प्रत्येक खोल समुद्रातील प्रकल्पासाठी सुमारे एक हजार कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यासाठी सरकारकडून आर्थिक मदत मिळणार असली, तरी त्याचे नेमके प्रमाण आणि कालमर्यादा अद्याप जाहीर करण्यात आलेली नाही. या प्रकल्पांमध्ये काही जागतिक ऊर्जा कंपन्यांचाही सहभाग असण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेच्या माध्यमातून वार्षिक दीड कोटी टनांनी जीवाश्म इंधनाचे उत्पादन वाढविण्याचे उद्दिष्ट ठेवली आहे. यामुळे कच्च्या तेलाची आणि नैसर्गिक वायूची परदेशातून होणारी आयात कमी होण्यास मदत होईल, ज्यामुळे भारताचे विदेशी अवलंबित्व घटेल. या संपूर्ण प्रकल्पात डिजिटल कार्यक्रम व्यवस्थापन, क्षमता बांधणी, नव्या तंत्रज्ञानाचा अवलंब, भागधारक सहभाग आणि आंतरराष्ट्रीय पोहोच यासाठी विशेष तरतुदी करण्यात आल्या आहेत. या सर्वसमावेशक नियोजनामुळे देशातील ऑफशोअर (समुद्रकिनारा लगतचे आणि समुद्रातील) अन्वेषण आणि उत्पादनाला एक मजबूत प्रोत्साहन मिळणार आहे.

# जिल्ह्याची स्वतंत्र ओळख निर्माण

धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर हा प्रस्तावित नवीन रेल्वे मार्ग दक्षिण महाराष्ट्र, कर्नाटक, तेलंगणा तसेच पुढील दक्षिण भारताशी अधिक थेट संपर्क प्रस्थापित करण्यासाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या रेल्वे जोडणीमुळे केवळ प्रवाशांची सुविधा वाढणार नाही, तर मालवाहतुकीसाठी अधिक सक्षम आणि कार्यक्षम रेल्वे नेटवर्क उपलब्ध होणार आहे. विशेषतः शेंद्रा-बिडकीन औद्योगिक क्षेत्रातील ऑटोमोबाईल, इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही), अभियांत्रिकी आणि कृषी प्रक्रिया उद्योगांना या मार्गाचा मोठा लाभ होण्याची शक्यता आहे. कंटेनर, औद्योगिक कच्चामाल, तयार उत्पादने तसेच कृषी मालाची वाहतूक अधिक वेगाने आणि कमी खर्चात करणे शक्य होईल. परिणामी उद्योगांची कार्यक्षमता वाढेल आणि मराठवाड्याच्या आर्थिक विकासाला मोठी चालना मिळेल. हा रेल्वे प्रकल्प भविष्यात मराठवाड्याच्या विकासाचा महत्त्वाचा टप्पा ठरू शकतो. दळणवळणाच्या सुविधांच्या बाबतीत मराठवाड्याने गेल्या काही वर्षांत प्रगती केली असली तरी अनेक मोठ्या प्रकल्पांसाठी सातत्याने पाठपुरावा करावा लागतो. या भागाला सक्षम पायाभूत सुविधांची आवश्यकता असून, त्यासाठी प्रभावी नियोजन आणि मजबूत नेतृत्वाची गरज आहे. वेळेची बचत आणि जलद प्रवासासाठी आज अनेक नागरिक विमानसेवेकडे वळत आहेत. मात्र, मराठवाड्यासारख्या आठ जिल्ह्यांच्या मोठ्या विभागात सध्या केवळ छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथेच विमानसेवा उपलब्ध आहे. भविष्यात या सुविधा अधिक जिल्ह्यांपर्यंत विस्तारल्यास प्रादेशिक विकासाला आणखी वेग मिळू शकतो. रेल्वे, विमान आणि रस्ते वाहतुकीचे सक्षम जाळे निर्माण झाल्यास मराठवाडा केवळ राज्याच्या नव्हे, तर देशाच्या आर्थिक विकासातील महत्त्वाचा केंद्रबिंदूबनू शकतो. जालना, बीड, परभणी, हिंगोली, लातूर आणि धाराशिव या जिल्ह्यांतील नागरिकांना विमान प्रवासासाठी आजही शेकडो किलोमीटरचा प्रवास करून विमानतळ गाठावे लागते. छत्रपती संभाजीनगर आणि नांदेड येथून मोजक्याच शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध असल्याने अनेक प्रवाशांना मुंबई किंवा पुणे गाठून पुढील हवाई प्रवास करावा लागतो. काही महिन्यांपूर्वी बीड येथे विमानतळ उभारणीच्या दृष्टीने हालचाली सुरू झाल्या होत्या. प्रस्तावित विमानतळासाठी बीडमध्ये तांत्रिक सर्वेक्षणही पूर्ण करण्यात आले आहे. त्यामुळे बीड विमानतळाच्या उभारणीचा मार्ग काही प्रमाणात मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष कामाला गती कधी मिळते यावरच बीडकरांचे विमानतळाचे स्वप्न अवलंबून आहे.

दरम्यान, लातूर विमानतळाच्या आधुनिकीकरणासाठी आणि पायाभूत सुविधांच्या विकासासाठी १ जून रोजी ५६ कोटी रुपयांच्या खर्चाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. या निधीतून लातूर विमानतळाचा विकास होऊन आगामी काळात तेथून विमानसेवा सुरू होण्याची शक्यता वाढली आहे.सध्या छत्रपती संभाजीनगर विमानतळावरून मुंबई, दिल्ली, हैदराबाद आणि बंगळुरू या प्रमुख शहरांसाठी विमानसेवा सुरू आहे. तर नांदेड विमानतळावरून बंगळुरू, हैदराबाद, गाझियाबाद, गोवा, पुणे, अहमदाबाद आणि नागपूर या शहरांसाठी विमानसेवा उपलब्ध आहे.मराठवाड्यातील बीड आणि लातूर येथून आगामी काळात विमानसेवा सुरू झाल्यास या भागाच्या औद्योगिक, पर्यटन आणि आर्थिक विकासाला मोठी चालना मिळणार आहे. नवीन रेल्वे मार्गासोबतच विमानसेवेचा विस्तार ही मराठवाड्यासाठी निश्चितच आनंदाची बाब ठरत आहे.राज्य शासन आणि केंद्र सरकारकडून पायाभूत सुविधांच्या विकासावर विशेष लक्ष दिले जात असल्याने मराठवाड्याच्या प्रगतीला नवी दिशा मिळत आहे. मराठवाड्यात रेल्वे विस्ताराच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. धाराशिव-बीड-छत्रपती संभाजीनगर या मार्गावरील सुमारे २४० किलोमीटर लांबीच्या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी देण्यात आली आहे. रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी नुकतीच लोकसभेत याबाबत माहिती दिली. मराठवाड्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी हा रेल्वे प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. या नवीन रेल्वे मार्गासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्यात येणार असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या सर्वेक्षणास रेल्वे मंत्रालयाने मान्यता दिली आहे. डीपीआर तयार करण्याचे काम सुरू झाले असून, अहवाल पूर्ण झाल्यानंतर राज्य शासनासोबत पुढील चर्चा करण्यात येणार आहे. त्यानंतर नीती आयोग, अर्थ मंत्रालय आणि इतर संबंधित संस्थांकडून आवश्यक मंजुरी घेतल्यानंतर प्रकल्पाच्या पुढील टप्प्यांबाबत निर्णय घेतला जाईल. कोणत्याही मोठ्या रेल्वे प्रकल्पाला तांत्रिक, आर्थिक आणि प्रशासकीय अशा विविध स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण करावी लागते. या प्रक्रियेतील पहिला टप्पा म्हणून या नवीन रेल्वे मार्गाच्या सर्वेक्षणाला मंजुरी मिळाली आहे. धाराशिव आणि बीड हे मराठवाड्यातील असे जिल्हे आहेत, जिथे रेल्वे सुविधांचा विस्तार तुलनेने कमी आहे. त्यामुळे या नवीन रेल्वे मार्गामुळे या दोन्ही जिल्ह्यांना मोठा फायदा होण्याची अपेक्षा आहे. या मार्गामुळे प्रवास सुलभ होण्यासोबतच व्यापार, उद्योग, रोजगार आणि पर्यटन क्षेत्रालाही चालना मिळणार आहे. विशेष म्हणजे, हा रेल्वे मार्ग केवळ धाराशिव आणि बीड जिल्ह्यांपुरता मर्यादित न राहता संपूर्ण मराठवाड्याच्या विकासाला नवी दिशा देणारा ठरू शकतो. या मार्गामुळे मराठवाड्यातील विविध धार्मिक आणि पर्यटन स्थळांना भेट देणाऱ्या प्रवाशांची सोय होणार असून, या भागाच्या आर्थिक आणि सामाजिक विकासाला मोठी गती मिळण्याची शक्यता आहे. रेल्वेचा विकास हा कोणत्याही प्रदेशाच्या आर्थिक आणि औद्योगिक प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक मानला जातो. छत्रपती संभाजीनगर हे सध्या राज्यातील वेगाने विकसित होणाऱ्या शहरांपैकी एक म्हणून ओळखले जात आहे. औद्योगिक विकास, उत्पादन क्षेत्र आणि लॉजिस्टिक हब म्हणून या जिल्ह्याने स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक शामसुंदर चितोडा यांनी **जगमित्र ऑफसेट भोकरदन नाका, संभाजीनगर ता.जि.जालना ४३१२०३ (महाराष्ट्र)** येथे छापून, दैनिक चकमक कार्यालय जालना येथे प्रसिध्द केले. पि.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची राहील. **संपादक शामसुंदर चितोडा, कार्यकारी संपादक कैलास फुलारी** (जालना जिल्हा न्यायालयाअंतर्गत) RNI NO. MHMAR/rni/reg.no.mahmar/59900/93/A4110 **मो.न.९४२२७९६०८८, ९४०३४९४४२२**


# अहिल्यानगरच्या शेतकऱ्यांना कर्जमाफीचा मोठा दिलासा, दुसऱ्या हप्त्यात ३४८ कोटी जमा

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेअंतर्गत अहिल्यानगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मोठा आर्थिक दिलासा मिळाला आहे. कर्जमाफीच्या दुसऱ्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करण्यात आली असून, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ३६ हजार ४२४ कर्जदार शेतकऱ्यांना याचा लाभ मिळाला आहे. त्यांच्या खात्यावर एकूण ३४८ कोटी ५१ लाख रुपये वर्ग करण्यात आले आहेत. यापूर्वी ७ ऑगस्ट रोजी कर्जमाफीचा पहिला हप्ता जाहीर करण्यात आला होता. त्यामध्ये जिल्हा बँकेच्या ६६ हजार १३९ शेतकऱ्यांना ६२७ कोटी ४७ लाख २६ हजार ५६२ रुपयांचा लाभ मिळाला होता. आता दुसरा हप्ताही वितरित झाल्याने जिल्हा बँकेच्या कर्जमुक्त झालेल्या शेतकऱ्यांची संख्या १ लाख २ हजार ५६३ वर पोहोचली आहे. या शेतकऱ्यांच्या खात्यावर आतापर्यंत एकूण ९७५ कोटी ९८ लाख ४८ हजार ६३१ रुपये जमा झाले आहेत कर्जाच्या ओझ्याखालील शेतकऱ्यांना मोठा आधार जिल्हा मध्यवर्ती बँकेसोबतच राष्ट्रीय आणि व्यापारी बँकांच्या शेतकऱ्यांनाही कर्जमाफीचा लाभ मिळत आहे. आतापर्यंत जिल्हा बँकेच्या १ लाख २ हजार ५६३ आणि राष्ट्रीय व व्यापारी बँकांच्या १२ हजार ६५२ अशा एकूण १ लाख १५ हजार २१५ शेतकऱ्यांच्या खात्यावर सुमारे १ हजार ११४ कोटी रुपये जमा झाले आहेत. कर्जमाफीमुळे पीक कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांना मोठा आर्थिक आधार मिळाला आहे. आगामी खरीप आणि रब्बी हंगामासाठी लागणारा खर्च, शेतीची मशागत आणि इतर आर्थिक नियोजन करण्यासाठी या



मदतीचा फायदा होणार आहे. दुसर्या हप्त्यात तालुकानिहाय लाभ दुसऱ्या हप्त्यात अकोले तालुक्यातील १ हजार ८३५ शेतकऱ्यांना १६ कोटी ५८ लाख ९६ हजार रुपये, जामखेडमधील २ हजार ४४६ शेतकऱ्यांना २ कोटी ३६ लाख १९ हजार रुपये, कर्जतमधील २ हजार ६१ शेतकऱ्यांना २० कोटी ८८ लाख ४० हजार रुपये आणि कोपरगावमधील ६२८ शेतकऱ्यांना ६ कोटी १८ लाख ७२ हजार रुपयांचा लाभ मिळाला. अहिल्यानगर तालुक्यातील १ हजार ८४१ शेतकऱ्यांना १५ कोटी ८० लाख ४३ हजार रुपये, पारनेरमधील १ हजार ४४६ शेतकऱ्यांना १० कोटी ७ लाख ९२ हजार रुपये, पाथर्डीतील २ हजार ६८ शेतकऱ्यांना १६ कोटी १३ लाख ४२ हजार रुपये आणि राहाता तालुक्यातील ७९४ शेतकऱ्यांना ६ कोटी ३४ लाख २३ हजार रुपये मिळाले. तर संगमनेर तालुक्यातील १ हजार ५३६ शेतकऱ्यांना १३ कोटी ४२ लाख ९० हजार रुपये आणि श्रीरामपूरमधील १ हजार ६५४ शेतकऱ्यांना १४ कोटी ४६ लाख ३ हजार रुपये कर्जमाफीचा लाभ मिळाला आहे. सर्वाधिक लाभार्थी छत्रपती संभाजीनगर विभागात दरम्यान, दुसऱ्या टप्प्यात सर्वाधिक लाभार्थी छत्रपती संभाजीनगर विभागात ३ लाख २ हजार २७३ असून, त्यांच्या खात्यावर २ हजार २८४ कोटी ४४ लाख ६ हजार ५९० रुपये वितरित करण्यात आले. या विभागात बीडमध्ये ४०० कोटी ३२ लाख, छत्रपती संभाजीनगरमध्ये २८७ कोटी ३२ लाख, धाराशिवमध्ये १८३ कोटी ८५ लाख, हिंगोलीमध्ये १९५ कोटी ६१ लाख, जालन्यात ३६६ कोटी २७ लाख, लातूरमध्ये १२१ कोटी ७ लाख, नांदेडमध्ये ३८१ कोटी ९४ लाख आणि परभणीत ३४८ कोटी २ लाख रुपये वितरित करण्यात आले.

# कृती सेनॉनच्या राखीच्या जाहिरातीने घेतलं राजकीय वळण; राहुल गांधींच्या समर्थनानंतर कंगना रणौतचा टोला



मुंबई : अभिनेत्री कृती सेनॉनच्या राखीच्या जाहिरातीवरून सुरू झालेला वाद आता राजकीय वळणावर पोहोचला आहे. जाहिरातीवरून झालेल्या टीकेनंतर काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी कृतीच्या भूमिकेला पाठिंबा दिला. त्यानंतर भाजप खासदार आणि अभिनेत्री कंगना रणौतने राहुल गांधींवर निशाणा साधला आहे. कृतीच्या जाहिरातीवर प्रतिक्रिया देताना राहुल गांधी यांनी महिलांना त्यांच्या कपड्यांवरून आणि निवडीवरून ट्रोल करू नये, असे म्हटले. एक स्त्री काय घालते, ती काय करते आणि कुठे जाते, हा तिचा वैयक्तिक निर्णय आहे, असे म्हणत त्यांनी डरिहढ्ढहशझरींळरीलहू हा हॅशटॅग वापरला. यानंतर कंगना रणौतने भाजपच्या इन्स्टाग्राम अकाऊंटवरील राहुल गांधींवरील टीकात्मक पोस्ट आपल्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केली. त्यासोबत तिने भाऊ, थांब. भारत माता की जय. चला सुरुवात करूया, असा टोला लगावला. भाजपच्या या पोस्टमध्ये महिला आरक्षण विधेयक, तिहेरी तलाक आणि कर्नाटक मंत्रिमंडळातील महिला प्रतिनिधित्वाचा मुद्दा उपस्थित करत काँग्रेसच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात आले आहे.

वाद कशावरून झाला ?

एका ज्वेलरी ब्रँडच्या राखीच्या जाहिरातीत कृती सेनॉन ब्रॅलेट ड्रेसमध्ये दिसते. ती आपल्या भावाला राखी बांधण्यापूर्वी कुत्र्याला राखी बांधताना दाखवण्यात आली आहे. यावर काही सोशल मीडिया यूजर्सनी तिच्या पोशाखासह जाहिरातीतील आशयावर आक्षेप घेतला. कंगना रणौतने यापूर्वीही जाहिरातीवर टीका करत, जेव्हा कपड्यांचे इतके पर्याय आहेत, तेव्हा भावाला बिकिनी किंवा अंतर्वस्त्रांमध्ये राखी का बांधाल? असा सवाल केला होता.

कृती सेनॉनचे प्रत्युत्तर

कृतीने या टीकेला उत्तर देताना रक्षाबंधनाचा अर्थ कपड्यांपेक्षा भावना आणि नात्यातील प्रेमात असल्याचे म्हटले. तिच्या मते, भाऊ-बहिणीप्रमाणेच ती आणि तिची बहीण एकमेकींचे रक्षण करण्याचे वचन देतात आणि त्यांच्या कुत्र्यांनाही कुटुंबाचा भाग मानतात. तिने पुढे महिलांच्या कपड्यांवरून त्यांच्या संस्कृतीचा किंवा परंपरेचा आदर ठरवण्यावरही प्रश्न उपस्थित केला. संस्कृती आणि परंपरा ही मनात असते, कपड्यांच्या गळ्याच्या मापात नाही, असा मुद्दा तिने मांडला. दरम्यान, राहुल गांधींच्या समर्थनानंतर कंगनाने केलेल्या टीकेमुळे हा जाहिरातीचा वाद आता महिलांचे स्वातंत्र्य, पोशाख आणि राजकीय भूमिकांवरील चर्चेत बदलला आहे.

# घरकुल सर्वेक्षणामध्ये सावळा गोंधळ!
## पात्र लाभार्थी वंचित; जिरडगावात ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षणाची मागणी

घनसावंगी/वार्ताहर :प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) अंतर्गत घनसावंगी तालुक्यात करण्यात आलेल्या घरकुल सर्वे क्षणात मोठा सावळा गोंधळ झाल्याचे उघड झाले असून जिरडगाव येथील अनेक खरे गरजू लाभार्थी घरकुलापासून वंचित राहिले आहेत. या अन्यायाविरोधात जिरडगाव येथील सामाजिक कार्यकर्त्या वर्षा शामसुंदर शिंदे आणि सामाजिक कार्यकर्ते शामसुंदर हरिभाऊ शिंदे यांनी आक्रमक भूमिका घेतली आहे. त्यांचे म्हणणे आहे की, सर्वेक्षणात प्रत्यक्ष स्थळ पाहणी न करता मनमानी पद्धतीने याद्या तयार करण्यात आल्या. ज्यांच्याकडे पक्की घरे आहेत त्यांची नावे पात्र यादीत आहेत, तर कुडाच्या व झोपडीत राहणाऱ्या गरजूंची नावे वगळण्यात आली आहेत. या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रशासनाकडे

**गरजूंना न्याय मिळेपर्यंत आमचा लढा सुरूच राहील. ग्रामसभा घेऊन फेरसर्वेक्षण हाच एकमेव न्याय्य मार्ग आहे.**

**शामसुंदर शिंदे,**
**सामाजिक कार्यकर्ते**

**ज्यांच्याकडे सर्व सुखसोयी आहेत त्यांना लाभ मिळतोय आणि खरा गरजू आजही वंचित आहे. हा प्रकार खपवून घेतला जाणार नाही.**

**वर्षा शिंदे,**
**सामाजिक कार्यकर्त्या**

ठाम मागणी केली आहे की, तात्काळ ग्रामसभा बोलावून राहिलेल्या सर्व वंचित पात्र लाभार्थ्यांची नावे ग्रामसभेमध्ये घेऊन संपूर्ण यादीचे फेरसर्वेक्षण करावे. जर प्रशासनाने तातडीने दखल घेतली नाही तर संबंधित विभागाकडे रीतसर लेखी तक्रारी दाखल करून वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा केला जाईल.

# कृती सेनॉनच्या राखी जाहिरातीवरून गायक सोनू निगमची सणसणीत ट्विटर पोस्ट

मुंबई : अभिनेत्री कृती सेनॉनच्या राखीच्या जाहिरातीवरून सुरू असलेल्या वादात आता गायक सोनू निगमने भूमिका मांडली आहे. सोनू निगमने ट्विटर (द) पोस्टद्वारे या जाहिरातीवर टीका करत म्हटलं, हा मुद्दा महिलांनी काय परिधान करावे याचा नसून, दुहेरी निकष आणि हिंदू सणांच्या परंपरांशी संबंधित संवेदनशीलतेचा असल्याचे आहे. बसोनू निगमने आपल्या पोस्टमध्ये स्पष्ट केले की, महिलांनी काय घालावे, हा वादाचा मुद्दा नाही. दिक्कत दुहेरीपणाशी आहे, असे म्हणत सोनू निगमने हिंदू सणांच्या जाहिरातींमध्ये धार्मिक आणि सांस्कृतिक परंपरांचा विचार करण्याची गरज व्यक्त के ली. यासाठी त्यांनी गुरुद्वारात डोके झाकण्याची परंपरा तसेच काही मंदिरांमध्ये विशिष्ट



पोशाखाबाबत असलेल्या नियमांचा दाखला दिला. कधी काय घालावे, याचेही एक शिष्टाचार असतात, अशी भूमिका त्याने या पोस्टद्वारे मांडली. हिंदू समाजाच्या धार्मिक भावनांचा वारंवार विचार न करता केवळ ‘महिलांच्या स्वातंत्र्या’चा मुद्दा पुढे करणे योग्य नसल्याचेही सोनू निगमने म्हटले. विक्टिम कार्ड खेलने की जगह लोकतांत्रिक देश में हिंदुओं की आस्था पर कुठाराघात करना बंद करें, असे म्हणत सोनू निगमने हिंदू समाजाच्या धार्मिक भावनांचा आदर करणे महत्वाचे असल्याचे सांगितले. हिंदू सहनशील आहे, याचा अर्थ त्याच्या संयमाची वारंवार परीक्षा घ्यावी असा नाही, असेही त्याने नमूद केले. दरम्यान, सोनू निगमने आपल्या पोस्टच्या शेवटी, जाहिरात हटवल्याबद्दल ऋखत-चे आभारही व्यक्त केले आहेत. कृती सेनॉनच्या राखीच्या जाहिरातीवरून यापूर्वी सोशल मीडियावर अनेक संमिश्र प्रतिक्रिया उमटल्या होत्या. काहींनी जाहिरातीतील पोशाख आणि मांडणीवर आक्षेप घेतला, तर काहींनी महिलांच्या स्वातंत्र्याचा मुद्दा मध्ये आणत कपड्यांवरून होणाऱ्या टीकेला विरोध केला. एकंदरच या प्रकरणाने असंख्य दृष्टिकोन समोर आणत महिला स्वातंत्र्य, धार्मिक परंपरा आणि जाहिरातींमधील सांस्कृतिक संवेदनशीलता यांसारखे प्रश्न चर्चेत आणले आहेत.

### कागदीज्ञापन...

प्रकल्पमहत्वाकांक्षी
नकोय कागदीज्ञापन
शुभारंभजल्लोषपूर्ण
उत्सव होतो सुसंपन्न

अधिकारी बुध्दीमान
निवड अनुभवसंपन्न
निष्कलंक रे ठेकेदार
सूज्ञशासकस्थानापन्न

घिसाडघाईत निर्मित
प्रोजेक्टअकालोत्पन्न
तुघलकी कार्य करता
निराशा होते निष्पन्न

सातत्यनिधी अभावी
वायदे होई मरणासन्न
अकाली मृत्यू निश्चित
स्वप्नेभंगे छिन्नविछिन्न

विश्वासा घेई ग्रामस्था
कणा खरेजनसामान्य
जनमत दणकटन्यास
निर्णय व्हावेसर्वमान्य

एकमत अति अवघड
मते मतांतरे रे विभीन्न
मोडता घालाया आधी
फिरे द्रोहीकाळेकभिन्न

प्रकल्प टाळा दिखाऊ
टिकवायला सिंहासन
कोसळे वालूक मनोरे
पदरी पडेल रे प्रहसन

– हेमंत मुसरीफ पुणे
– ९७३०३०६९९६

### कुटाणा...

भाऊबंदकी मिटावी
परत करतो कुटाणा
नवीनकवळी बसली
फोडू पाहतो वाटाणा

मध्ये खौट शेंगदाणा
आडे सडला फुटाणा
किती वेळा हाकाली
जारेबाबांनो फुटा ना

दिल्लीवारी फुकटची
भोकेपडलीयं बुटांना
नेमकी चुकवी दिशा
काय झालेय वाटांना

नवीन चुना लिंपतोयं
रे भुसभुशीत विटांना
झिरपू गेले गोडपाणी
छिद्रे मोठालीमाठांना

भाषणे करुन कंटाळे
कोरड पडते ओठांना
मतेदेताना विसरतात
का समजेना थोटांना

मधात बुचकाळे हात
मध माशांनो चाटाना
दूरध्वनी रे शंखध्वनी
समोरा समोर भेटाना

वाटून वाटून संपल्या
असंख्यवाटा नोटांना
चिन्ह आमचे दाबता
का धाड भरे बोटांना

– हेमंत मुसरीफ पुणे
– ९७३०३०६९९६

पान १ वरून

## अल्प पावसामुळे

संवेदनशील भूमिका घेत पीक विमा, विशेष आर्थिक पॅकेज, कर्ज सवलत तसेच पाणी व चारा उपलब्ध करून देत शेतकऱ्यांच्या पाठीशी ठामपणे उभे राहावे, अशी अपेक्षा बबनराव लोणीकर यांनी व्यक्त केली आहे. या पत्राची प्रत महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच जिल्हाधिकारी, जालना यांना माहितीस्तव देण्यात आली आहे.

**कर्जवसुलीला स्थगिती देण्याची मागणी**

पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक परिस्थिती आणखी बिकट होणार असल्याने पीक कर्जाच्या वसुलीस स्थगिती देऊन कर्जाचे पुनर्गठन करावे, अशी मागणीही पत्राद्वारे करण्यात आली आहे. पुढील हंगामासाठी शेतकऱ्यांना बियाणे, खते व इतर कृषी निविष्ठांसाठी विशेष मदत उपलब्ध करून देण्याची मागणी करण्यात आली आहे.

**चारा व पाणी उपलब्ध करून द्यावे**

पावसाअभावी निर्माण होणाऱ्या पाणी व चारा टंचाईवर तातडीने उपाययोजना करण्याची गरज असल्याचे लोणीकर यांनी म्हटले आहे. जनावरांसाठी चारा डेपो अथवा चारा छावण्या सुरु कराव्यात, आवश्यक ठिकाणी पाण्याची व्यवस्था करावी तसेच गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण झाल्यास टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

## शहागड येथे पत्रकाराच्या

सुरु असल्याची माहिती आहे. घटनेनंतर संबंधित कुटुंबीयांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरातील नागरिकांमध्येही या प्रकाराबाबत चिंता व्यक्त होत आहे.

**गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल**

या प्रकरणी गोंदी पोलिसांनी भारतीय न्याय संहिता (बीएनएस) २०२३ मधील कलम १०९(१), ११८(२), ११५(२), ३५२, १८९(२), १९१(२), १९१(३), १९० व ३२४(४) तसेच शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम ४ व २५ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास गोंदी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक किरण हावले करीत आहेत.

**आरोपींना तातडीने अटक करण्याची मागणी**

पत्रकाराच्या घरावर हत्यारांसह झाल्याचा आरोप असलेला हा प्रकार अत्यंत गंभीर असून, प्रकरणातील आरोपी मोकाट राहिल्यास फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांमध्ये अधिक भीतीचे वातावरण निर्माण होण्याची शक्यता आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणाचा निष्पक्ष, सखोल व वेगाने तपास करून सर्व आरोपींचा शोध घेऊन त्यांना लवकरात लवकर अटक करावी, अशी मागणी जोर धरत आहे. पत्रकारिता करताना पत्रकाराला किंवा त्याच्या कुटुंबीयांना धमकावणे, दबाव आणणे अथवा दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न होत असेल तर अशा प्रकारांची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे. त्यामुळे पोलिस प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने पाहून फिर्यादी व त्यांच्या कुटुंबीयांना आवश्यक सुरक्षा देण्यासह दोषी आढळणाऱ्यांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी पत्रकारिता क्षेत्रातूनही होत आहे.

## जालना शहरातील

प्रमुख मार्गांवरील वाहतूक व्यवस्था सक्षम करणे अत्यंत आवश्यक आहे. बायपास वळण रस्ता आणि रेल्वे पुलांचे काम यापूर्वी युती शासनाच्या काळात आपणच करून घेतले होते. मात्र वाढत्या वाहतुकीमुळे आता या पुलांचे विस्तारीकरण व नवीन समांतर पूल आवश्यक झाले होते. त्यासाठी केंद्र सरकारकडे सातत्याने पाठपुरावा केला. दोन महत्त्वपूर्ण रेल्वे पुलांच्या कामांना ९७.६२ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून प्रत्यक्ष कामाचा मार्ग मोकळा केल्याबद्दल ✻आ. खोतकर यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री मा. ना. नितीनजी गडकरी व केंद्रीय रेल्वेमंत्री मा. ना. अश्विनी वैष्णव,व माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांचे विशेष आभार व्यक्त केले.

या दोन्ही पुलांचे काम पूर्ण झाल्यानंतर जालना शहरातील बायपास वळण रस्त्यावरील वाहतूक अधिक सुरळीत होणार असून, शहराच्या दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. त्यामुळे जालना शहराच्या वाहतूक व्यवस्थेच्या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

## तालुका ग्रामीण काँग्रेस

गजानन भोकरे, फकीरभाई मोहिते, शिवाजी मोहिते, माऊली इंगोले, रामभाऊ पवार, संतोष राठोड, विक्रम चव्हाण, लक्ष्मण मोरे, विजय राठोड, सुरेश कदम, अजिमभाई, विनोद खरात, कृष्णा सोमधाने, रमेशराव काळकूंबे, रविभाऊ जाधव, शेख मोईन भाई, शिवदास म्हस्के, गजानन जाधव, संदीप वाघ, रशीदभाई, तसेच रहीम तांबोळी. बैठकीमध्ये संघटनात्मक बांधणी, पक्षविस्तार, आगामी निवडणुकांच्या अनुषंगाणे नियोजन तसेच जनतेच्या,शेतकऱ्यांच्या विविध प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. उपस्थित मान्यवरांनी कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत काँग्रेस पक्षाची विचारधारा व जनहिताची भूमिका अधिक प्रभावीपणे लोकांपर्यंत पोहोचविण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नारायण वाढेकर यांनी केले. तर आभार प्रदर्शन सोपानराव तिरुखे यांनी केल. बैठकीस मोठ्या संख्येने पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

पान ४ वरून

## रोजगार हा तरुणांना

तर आपल्या भागातील नागरिकांच्या समस्या समजून घेणे त्यावर अभ्यासपूर्ण उपाय सुचवणे आणि त्या उपायांची प्रभावी अंमलबजावणी करून घेणे ही युवा लोकप्रतिनिधींची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. करिता प्रत्येकाने आपल्या मतदारसंघाचा आपल्या शहराचा आणि आपल्या समाजाचा सखोल अभ्यास करावा. तसेच पॉलिसी मेकिंगमध्ये तरुणांचा सहभाग अधिक प्रभावी झाला पाहिजे. असे सांगून बदलत्या काळानुसार रोजगार, शिक्षण, कौशल्य विकास, तंत्रज्ञान, उद्योग, महिला, युवा सक्षमीकरण, क्रीडा, नागरी सुविधा आणि सामाजिक विकास यासारख्या विषयावर लोकप्रतिनिधींनी केवळ प्रतिक्रिया न देता ठोस धोरणात्मक भूमिका मांडली पाहिजे असे सांगितले. या बैठकीत जालना महानगर पालिकेचे युवा नगरसेवक अश्विन भास्करराव अंबेकर म्हणाले की, सध्या तरुणांसमोर रोजगाराचा मोठा प्रश्न आहे. राज्यात उद्योगांचे मुंबई, पुणे, ठाणे, छ.संभाजीनगर अशा भागात केंद्रीकरण झाल्यानेही जालना जिल्ह्यासारख्या जिल्ह्यातील तरुणांच्या हाताला रोजगार मिळणे अवघड झाले आहे. त्यामुळे जालन्यासारख्या विकासात मागे असलेल्या जिल्ह्यातही मोठे उद्योग उभारणे अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी खा.डॉ.श्रीकांत शिंदे यांनीही आवर्जून नगरसेवक अश्विन अंबेकर यांच्याशी आस्थेवाईकपणे संवाद साधला. याबैठकीत युवा लोकप्रतिनिधी मांडलेले प्रश्न अडचणी आणि त्यांचे म्हणणे ही जाणून घेतले त्यांच्या मतांना आणि सूचनांना सकारात्मकपणे समजून घेत विविध विषयावर पुढे काय करता येईल याबाबत सविस्तर चर्चा केली. त्यांनी मांडलेल्या प्रश्नावर योग्य ती कारवाई कशी करता येईल याची माहिती जाणून घेतली. यावेळी युवा लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शेतकऱ्यांच्या समस्या

बद्रीनाथ पठाडे, पद्माकर जऱ्हाड, भगवान मात्रे, राजेंद्र बापू जऱ्हाड, तहसीलदार हेमंत तायडे, भगवान बारगाजे, जि. प. उपअभियंता लक्ष्मण राऊत, हरिश्चंद्र बाबा शिंदे, सरपंच सौ. राधाताई शिंदे, उपसरपंच सौ. योगिताताई शिंदे, बाबासाहेब कऱ्हाळे, रवींद्र बोचरे, राधाकिसन शिंदे, विष्णू शिंदे, पुरुषोत्तम जोशी, विनोद मगरे, गणेश कोल्हे, गजानन काटकर, जितेंद्र कुलकर्णी, भरत गारखेडे, बाबासाहेब दिवटे, अजय देशमुख, बजरंग दादा वैद्य, भाऊसाहेब वैद्य, परमेश्वर गोते, दिगंबर वैद्य, विष्णू काटे, सुधीर पवार, विठ्ठल राठोड, ईश्वर जाधव, जुबेर पटेल, अमोल चव्हाण, शंकर घोगरे, सदाशिव कोल्हे, नंदू धोत्रे, सीताराम गोरे, राधाकिसन धोत्रे, खंडूजी काळवणे, नारायण वैद्य, शिवा दादा कोळकर, शरद अवघड, पांडू पल्हे, अनिल कोळकर यांच्यासह संबंधित गावांतील ग्रामस्थ व शेतकरी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अल्पवयीन मुलीवर

शाळेच्या नोंदींचाही पुरावा सादर करण्यात आला. न्यायालयाने साक्षी-पुरावे आणि सरकार पक्षाचा युक्तिवाद ग्राह्य धरून मुख्य आरोपी नितीन पोटदुखे यास संबंधित कलमांनुसार १० वर्षे सक्तमजुरी व दंडाची शिक्षा सुनावली. दंडाची रक्कम न भरल्यास अतिरिक्त कारावासाची शिक्षाही न्यायालयाने सुनावली आहे. तसेच दंडातून वसूल होणारी २० हजार रुपयांची रक्कम पीडितेला देण्याचे आदेश न्यायालयाने दिले.या प्रकरणाचा तपास तत्कालीन सहायक पोलीस आयुक्त रवींद्र साळोखे व उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील जायभाये यांनी केला. पोलीस अधीक्षक जालना, अपर पोलीस अधीक्षक जालना व संबंधित अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी आणि जिल्हा सरकारी वकील कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी खटल्यासाठी सहकार्य केले.विशेष जिल्हा सरकारी अभियोक्ता वर्षा लक्ष्मीकांत मुकीम यांनी सरकार पक्षातर्फे प्रभावी युक्तिवाद केला

# अंगणवाडीतील खिचडी आणि शाळांमधील 'मिड-डे मील'ची तपासणी होणार;अन्न व औषध प्रशासनाचे निर्देश

मुंबई : अन्न सुरक्षेच्या मुद्यावर राज्यभरात धडक मोहीम राबवणारे अन्न व औषध प्रशासनाने आता आपला मोर्चा अंगणवाड्या आणि शाळांमधील पोषण आहाराकडे वळवला आहे. राज्यातील अंगणवाड्यांमधील पोषण आहार, शालेय पोषण आहार आणि 'मिड-डे मील'च्या व्यवस्थेची तपासणी करण्याचे निर्देश एफडीएच्या सर्व अधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत. या निर्णयामुळे निकृष्ट दर्जाचे जेवण पुरवणाऱ्या आणि विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या यंत्रणा रडारवर आल्या आहेत. अन्न आणि औषध प्रशासनाकडून सरकारी असो वा खासगी, कोणत्याही आस्थापनेत कसलाही भेदभाव केला जात नसल्याचे मुंढे यांनी बुधवारी स्पष्ट केले. यापूर्वी आमदार निवासाचे कॅन्टीन असो किंवा मंत्रालयातील कॅन्टीन, एफडीएने ११५ हून अधिक सरकारी व निमसरकारी ठिकाणी तपासण्या करून नियमभंग करणाऱ्यांवर दंडात्मक व निलंबनाची कारवाई केली आहे. याच धर्तीवर आता शाळा आणि अंगणवाड्यांमधील आहाराची गुणवत्ता तपासली



जाणार आहे. अनेक ठिकाणी विद्यार्थ्यांना निकृष्ट दर्जाचे जेवण, भुंगे लागलेली कडधान्ये किंवा अन्नात अळ्या आढळल्याच्या तक्रारी समोर आल्या होत्या. याची गंभीर दखल घेत एफडीएने मुंबईत गेल्या आठवड्यात ८ ते १० 'सेंट्रल किचन्स'ची अचानक तपासणी केली. तेथून अन्नाचे नमुने घेण्यात आले असून, एका सेंट्रल किचनचा परवाना तात्काळ निलंबित करण्यात आला आहे. आता राज्यभरात अंगणवाडी आणि शालेय आहार व्यवस्थेची व्यापक तपासणी मोहीम राबवली जाणार आहे. शाळा आणि अंगणवाड्यांमध्ये वर्षातून किमान दोन वेळा नियमित तपासणी केली जाईल, तसेच दरमहा अन्न नमुने घेण्याची प्रक्रिया राबवली जाईल. 'बॅलन्स्ड डायटरी स्कोप'च्या आदेशानंतर या तपासणीचा दुसरा टप्पा सुरू करण्यात आला असून, लहान मुलांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्या कोणाचीही हयगय केली जाणार नाही, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे.

# रोजगार हा तरुणांना भेडसावणारा मोठा प्रश्न, जालन्यासारख्या जिल्ह्यातही नवीन उद्योग उभारावेत : अश्विन भास्करराव अंबेकर

जालना, प्रतिनिधी, (दि.२६) राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्यनेते मा. श्री.एकनाथजी शिंदे यांच्या आदेशानुसार शिवसेनेत २० ते ३० वयोगटातील निवडून आलेली युवा लोकप्रतिनिधी, विविध संस्था व समित्यांचे सदस्य तसेच महानगरपालिका, नगरपालिका, जिल्हा परिषद, पंचायत समिती आणि सहकार क्षेत्रातील युवा पदाधिकारी यांची महत्वाची बैठक मुंबई येथे संसदरत्न युवा खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाली. यावेळी योगेश कदम, सिद्धेश कदम, पक्ष प्रवक्त्या शायना एन.सी., खा.आनंद परांजपे,



सचिव भाऊसाहेब चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती. तर जालना जिल्ह्यातून महापालिकेचे युवा नगरसेवक अश्विन आंबेकर यांची उपस्थिती होती.

या बैठकीत सर्व युवा लोकप्रतिनिधीशी खासदार डॉ. शिंदे यांनी मनमोकळा संवाद साधला. साधला. यावेळी त्यांनी सांगितले कि, आपल्या पदाचा उपयोग लोकांच्या आयुष्यात सकारात्मक बदल घडण्यासाठी कसा करता येईल याचा सातत्याने विचार केला पाहिजे व यावर विशेष भर दिला. आजच्या काळात राजकारण केवळ प्रश्न मांडण्यापुरते मर्यादित राहता कामा नये. (पान ३ वर)

# मलंग शहा चौक ते भाजी मंडी परिसरात जशने मिलादुन्नबी उत्साहात; सोहेल भैय्या मित्र मंडळातर्फे गोड भाताचे भव्य वाटप

परतूर प्रतिनिधी : हजरत पैगंबर मोहम्मद साहेब यांच्या जयंतीनिमित्त जशने मिलादुन्नबीचा पवित्र आणि उत्साहपूर्ण सोहळा मलंग शहा चौक ते भाजी मंडी परिसरात मोठ्या भक्तिभावाने आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. सोहेल भैय्या मित्र मंडळाच्या वतीने मलंग शहा चौक परिसरात नागरिकांसाठी गोड भाताचे वाटप करण्यात आले. तसेच सामाजिक कार्यकर्ते सरफराज कायमखानी, नसीर कायमखानी, शफी कायमखानी, इब्राहिम कायमखानी, मुदसीर कायमखानी, अमन कायमखानी व आजार कायमखानी यांच्या वतीने भाजी मंडी परिसरात भव्य प्रमाणात गोड भाताचा प्रसाद



वाटप करण्यात आला. मलंग शहा चौकापासून भाजी मंडीपर्यंतच्या मुख्य मार्गावर ये-जा करणारे नागरिक, व्यापारी, महिला आणि लहान मुलांना मोठ्या आपुलकीने गोड भाताचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे परिसरात बंधुभाव, सामाजिक ऐक्य आणि एकतेचा संदेश अधोरेखित झाला. मिलादुन्नबीच्या निमित्ताने परिसरात धार्मिक वातावरणासोबतच सामाजिक सलोख्याचे दर्शन घडले. सर्वधर्मीय नागरिकांनी एकमेकांना शुभेच्छा देत या पवित्र दिवसाचा आनंद द्विगुणित केला. यावेळी सरफराज कायमखानी यांनी सर्व देशवासीयांना जशने मिलादुन्नबीच्या शुभेच्छा देत समाजात शांतता, प्रेम, समृद्धी आणि बंधुभाव कायम राहावा, अशी प्रार्थना केली. कार्यक्रमाला परिसरातील तरुण, ज्येष्ठ नागरिक, व्यापारी तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. सोहेल भैय्या मित्र मंडळाच्या नियोजनबद्ध आयोजनामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि आपुलकीचे वातावरण निर्माण झाले.



गोळेगाव येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त मा. नगराध्यक्ष तथा मा. जिल्हा प्रमुख मोहन अग्रवाल सहभागी होऊन जयंती उत्सव साजरा केला.

# विश्व बंधुत्व रक्तदान महाअभियान उत्साहात संपन्न ; दादी प्रकाशमणि जी यांच्या १९व्या पुण्यस्मृती दिनानिमित्त राजयोग भवन येथे रक्तदान शिबिर

जालना प्रतिनिधी : ब्रह्माकुमारीजच्या पूर्व मुख्य प्रशासिका राजयोगिनी दादी प्रकाशमणि जी यांच्या १९व्या पुण्यस्मृती दिनानिमित्त मानवसेवेच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेले 'विश्व बंधुत्व रक्तदान महाअभियान' उत्साहात संपन्न झाले. मंगळवार, दि. २५ ऑगस्ट २०२६ रोजी राजयोग भवन येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन रेखा दीदी, नगराध्यक्ष प्रतिनिधी आकाश राक्षे तसेच वॉर्ड क्रमांक ९ चे नगरसेवक प्रतिनिधी सावता काळे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मान्यवरांनी रक्तदानाचे महत्त्व विशद करून नागरिकांनी मानवतेच्या सेवेसाठी पुढे यावे, असे आवाहन केले. ब्रह्माकुमारी सेंटर, सरस्वती कॉलनी, सातोनकर मळा यांच्या वतीने आणि रेखा दीदी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. अनेक



रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली. रक्तदान हे केवळ दान नसून गरजू रुग्णाचे प्राण वाचविण्याचे महान कार्य असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. दादी प्रकाशमणि जी यांनी दिलेल्या मानवसेवा, प्रेम, बंधुत्व आणि आध्यात्मिक मूल्यांच्या संदेशाला कृतीची जोड देणारा हा उपक्रम ठरला. 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' या भावनेतून आयोजित या महाअभियानातून मानवता आणि विश्वबंधुत्वाचा प्रेरणादायी संदेश देण्यात आला. या सेवाकार्यात सहभागी झालेल्या सर्व रक्तदात्यांचे, मान्यवरांचे, आयोजकांचे तसेच सहकार्य करणाऱ्या सेवाभावी व्यक्तींचे आयोजकांच्या वतीने मनः पूर्वक आभार मानण्यात आले. रक्तसंकलनासाठी सहकार्य केल्याबद्दल जनकल्याण रक्तपेढीचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

# श्री संत शिरोमणी सावता माळी गौरव सन्मान पुरस्कार ना. छगनराव भुजबळ यांना प्रदान

जालना/प्रतिनिधी : श्री संत शिरोमणी सावता माळी यांच्या विचारांचा वारसा जपत सामाजिक कार्य केल्याबद्दल ज्येष्ठ नेते नामदार छगनराव भुजबळ यांना श्री संत शिरोमणी सावता माळी गौरव सन्मान पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. संस्थापक अध्यक्ष बाबासाहेब वानखेडे यांच्या हस्ते नाशिक येथे भुजबळ महाविद्यालयात ना. छगनराव भुजबळ यांना सदरील पुरस्कार प्रदान करण्यात आला. संत सावता माळी यांच्या विचारधारेनुसार सामाजिक कार्य केल्याबद्दल



हा सन्मान देण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले. हा पुरस्कार सावता माळी पुण्यतिथी समितीचे अध्यक्ष अश्विन भास्करराव अंबेकर, सचिव दीपक वैद्य, सहसचिव राजू इंगळे, उपाध्यक्ष राहुल रायकर, दशरथ तोंडुळे, मधुकर झरेकर तसेच माळी समाज बांधवांच्या वतीने प्रदान करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी ना. छगनराव भुजबळ यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेत विकासकामांचा आ.कुचे यांनी घेतला आढावा



बदनापूर : तालुक्यातील वरुडी, कडेगाव, संत सेवानगर तांडा, देवगाव, कस्तुरवाडी, कुसळी, माळेगाव, वाकुळणी, काशिगिरी तांडा आणि बाजार वाहेगाव येथे शेतकरी संवाद दौऱ्याच्या निमित्ताने शेतकरी बांधवांशी प्रत्यक्ष संवाद साधण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांच्या विविध अडचणी, समस्या, अपेक्षा व मागण्या जाणून घेत त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

शेतकरी हा ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून त्यांच्या कष्टाला बळ देण्यासाठी शासनाच्या विविध योजना व विकासकामांचा लाभ प्रत्येक पात्र शेतकरी बांधवापर्यंत पोहोचविण्यासाठी प्रयत्नशील राहण्याचा विश्वास यावेळी देण्यात आला. शेतकऱ्यांच्या प्रश्नांना प्राधान्य देऊन त्यांच्या हितासाठी सातत्याने पाठपुरावा करण्याची ग्वाहीही देण्यात आली. या दौऱ्यादरम्यान विविध गावांमध्ये स्मशानभूमी बांधकामाचे भूमिपूजन करण्यात आले. गावातील मूलभूत सुविधा मजबूत करण्यासोबतच शेतकरी बांधवांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी विकासकामांना गती देण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला. शेतकरी संवादाच्या माध्यमातून गावागावातील नागरिकांशी थेट संवाद साधत स्थानिक प्रश्न समजून घेणे, त्यावर प्रशासकीय स्तरावर योग्य कार्यवाही करणे आणि विकासकामांना गती देणे, हा दौऱ्याचा प्रमुख उद्देश होता. यावेळी भाजपा जालना माजी जिल्हाध्यक्ष (पान ३ वर)

# अल्पवयीन मुलीवर अत्याचार; मुख्य आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी

जालना । प्रतिनिधी : अल्पवयीन मुलीसोबत शारीरिक संबंध ठेवून तिला गर्भवती केल्याच्या प्रकरणात जालना येथील विशेष जिल्हा व सत्र न्यायालयाने मुख्य आरोपी नितीन दत्तू पोटदुखे यास १० वर्षे सक्तमजुरी व एकूण २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली. तसेच या प्रकरणात मदत केल्याच्या आरोपाखाली शिवाजी विश्वनाथ काळविले आणि बाली ऊर्फ किरण शिवाजी काळविले यांना प्रत्येकी सहा महिने सक्तमजुरी व प्रत्येकी पाच हजार रुपये दंडाची शिक्षा ठोठावण्यात आली. विशेष जिल्हा व सत्र न्यायाधीश केशव मोरे यांच्या न्यायालयाने २५ ऑगस्ट २०२६ रोजी हा महत्त्वपूर्ण निकाल दिला. सरकार पक्षातर्फे विशेष जिल्हा सरकारी अभियोक्ता वर्षा लक्ष्मीकांत मुकीम यांनी काम पाहिले. न्यायालयीन प्रकरणानुसार पीडित मुलगी घटनेच्या वेळी १६ वर्षांची होती. आरोपी आणि पीडिता यांची गावे जवळ असल्याने त्यांची ओळख होती. आरोपी नितीनकडे छोटा हत्ती वाहन होते आणि तो इतर मजुरांसह परिसरातील कामासाठी ये-जा करत होता. या ओळखीचा गैरफायदा घेत आरोपीने पीडितेशी जवळीक वाढवली. त्यानंतर लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी शारीरिक संबंध ठेवल्याने पीडिता गर्भवती राहिल्याचे प्रकरणातून समोर आले. पीडितेच्या कुटुंबीयांना हा प्रकार समजल्यानंतर ती काही काळ नातेवाइकांकडे राहिली. त्यानंतर आरोपी नितीन, शिवाजी काळविले व बाली ऊर्फ किरण काळविले यांनी पीडितेला घेऊन जाण्यास मदत केल्याचा आरोप होता. या प्रकरणी पीडितेच्या आईने पोलिसांत तक्रार दाखल केली होती. पुढील तपासानंतर आरोपींविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले. आठ साक्षीदारांची साक्ष ठरली महत्त्वाची या खटल्यात सरकार पक्षातर्फे एकूण आठ साक्षीदार तपासण्यात आले. पीडित मुलगी, तिचे वडील, घटनास्थळ पंच, पीडितेची जन्मतारीख सिद्ध करणारे शाळेचे मुख्याध्यापक, डॉक्टर आणि तपास अधिकाऱ्यांच्या साक्षी न्यायालयीन सुनावणीत महत्त्वाच्या ठरल्या. पीडिता अल्पवयीन असल्याचे सिद्ध करण्यास (पान ३ वर)

# चंदनझिरा पोलीस ठाण्याला मिळणार हक्काची अद्ययावत इमारत !

जालना/प्रतिनिधी : चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या स्थापनेपासून सुरू असलेल्या प्रवासात एक महत्त्वपूर्ण टप्पा आता गाठला जात असून, पोलीस ठाण्यासाठी एमआयडीसी परिसरातील त्रिमूर्ती चौक येथे अत्याधुनिक व सुसज्ज नवीन इमारत उभारण्यात येणार आहे. सदर नवीन इमारतीचे भूमिपूजन दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री मा. पंकजाताई मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे. चंदनझिरा पोलीस ठाण्याची स्थापना सन २०१४ मध्ये झाली. स्थापनेपासून आजपर्यंत पोलीस ठाण्याचे कामकाज आयटीआय कॉलेजच्या इमारतीमध्ये सुरू आहे. वाढती लोकसंख्या, वाढत्या गुन्हेगारीचा तपास, कायदा व सुव्यवस्थेची जबाबदारी, नागरिकांच्या तक्रारींचे निराकरण तसेच पोलिसांच्या दैनंदिन प्रशासकीय कामकाजासाठी अधिक प्रशस्त व स्वतंत्र इमारतीची आवश्यकता सातत्याने भासत होती. ही गरज लक्षात घेऊन गृह विभाग तसेच महाराष्ट्र राज्य पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळ, मुंबई यांच्या माध्यमातून चंदनझिरा पोलीस ठाण्यासाठी नवीन इमारत मंजूर करण्यात आली आहे. शासनाकडून मंजूर निधीतून एमआयडीसी भागातील त्रिमूर्ती चौक येथे नवीन पोलीस ठाण्याची सुसज्ज इमारत उभारण्यात येणार आहे. नवीन इमारतीमुळे पोलीस अधिकारी व अंमलदारांना अधिक चांगल्या कार्यपरिसरात काम करता येणार असून, नागरिकांना देखील पोलीस ठाण्यात येताना अधिक सुसज्ज,



सुरक्षित व नागरिकाभिमुख सुविधा उपलब्ध होणार आहेत. पोलीस ठाण्याच्या तपास, प्रशासकीय तसेच कायदा व सुव्यवस्थेच्या कामकाजाला यामुळे निश्चितच अधिक गती मिळणार आहे. दिनांक २७ ऑगस्ट २०२६ रोजी होणारे हे भूमिपूजन चंदनझिरा पोलीस ठाण्याच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण आणि ऐतिहासिक पाऊल ठरणार आहे. सन २०१४ पासून तात्पुरत्या स्वरूपाच्या इमारतीत कार्यरत असलेल्या चंदनझिरा पोलीस ठाण्याला आता स्वतःची अद्ययावत इमारत मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून, यामुळे पोलीस दलाच्या कार्यक्षमतेत वाढ होण्यासोबतच नागरिकांना अधिक प्रभावी व तत्पर पोलीस सेवा देणे शक्य होणार आहे. सुरक्षित जालना, सक्षम पोलीस व्यवस्था आणि नागरिकाभिमुख पोलीस सेवा या उद्दिष्टाच्या दिशेने नवीन पोलीस ठाण्याची इमारत एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. सदर भूमिपूजन कार्यक्रमास श्री. कल्याण काळे खासदार जालना, आमदार अर्जुन खोतकर, श्री. नारायण कुचे आमदार बदनापुर, श्री. विक्रम काळे आमदार मराठवाडा शिक्षक मदतरासंघ, श्री. सुहास शिरसाट विधान परिषद सदस्य छत्रपती संभाजीनगर-जालना, श्री. वीरेंद्र मिश्र विशेष पोलीस महानिरीक्षक छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र छत्रपती संभाजीनगर यांची उपस्थिती लाभणार आहे. सदर कार्यक्रमास उपस्थित राहणे करीता मा. पोलीस अधीक्षक जालना श्री. तेगबीरसिंह संधु, मा. अपर पोलीस अधीक्षक जालना डॉ. विक्रम साळी, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी, किरण बिडवे पोलीस निरीक्षक पोस्टे चंदनझिरा, श्री. दीपक कोहक मातोश्री इंटेरियर्स, श्री. अजित छाबडा सी. जी. असोसिएट्स जालना यांनी सर्व नागरीकांना आवाहन केले आहे.

# डॉ. नारायण सुब्बाराव हर्डीकर यांची जयंती उत्साहात साजरी

जालना : डॉ. नारायण सुब्बाराव हर्डीकर यांच्या जयंतीनिमित्त जालना जिल्हा काँग्रेस सेवादलाच्या वतीने विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून जयंती साजरी करण्यात आली. या वेळी जालना जिल्हा काँग्रेस सेवादल जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, काँग्रेस कमेटी तालुकाध्यक्ष कृष्णा पडुळ, जालना शहर काँग्रेस कमेटीचे सरचिटणीस सुराणा तसेच ग्रामीण सेवादलाचे कार्यकर्ते उपस्थित होते. जयंतीनिमित्त डॉ. हर्डीकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यांच्या सामाजिक कार्याचा व देशसेवेचा आदर्श पुढे नेत समाजहितासाठी कार्य करण्याचा संकल्प यावेळी करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान स्वच्छता, वृक्षारोपण व गरजू नागरिकांना मदत यांसारखे सामाजिक उपक्रम राबविण्याचा संदेश देण्यात आला. कार्यक्रमास काँग्रेस सेवादलाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.



राखी पौर्णिमा अवघ्या दोन दिवसावर येऊन ठेपली असून बाजारपेठ राख्यांनी सजले असून महिलांची गर्दी दिसून येत आहे. छायाचित्र किरण खानापुरे